प्रकरण पहिले

# कोल्हापूर जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालय

# प्रकरण पहिले
# कोल्हापूर जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालये

**प्रस्तावना :**

सार्वजनिक ग्रंथालयाच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे कार्य अप्रत्यक्षरित्या घडत असते आणि त्यामुळेच सार्वजनिक ग्रंथालये ही सांस्कृतीक उत्थांनाची केंद्रे म्हणून ओळखली जातात. अन्न, वस्त्र, निवारा ही मानवाची प्राथमिक गरज आहे. परंतु इतर प्राणीमात्रांपेक्षा मानवाची बुद्धिमत्ता व विचारशक्ती अधिक आहे. समाजाची बौद्धीक, मनोरंजनात्मक आणि माहितीविषयक गरज ग्रंथालयाद्वारे भागविली जाते. म्हणूनच समाजाच्या उन्नतीसाठी सार्वजनिक ग्रंथालयाची आवश्यकता आहे. आजच्या काळात समाजाच्या सर्वांगिण विकासामध्ये ग्रंथालयाचे महत्त्वाचे स्थान आहे. सार्वजनिक ग्रंथालये सेवाभावी कार्य करणाऱ्या संस्था म्हणून कार्यरत आहेत. त्यामुळे कोणत्याही संस्थेचा अभ्यास समाजाच्या प्रगतीचा मानदंड ठरतो.

भारतीय स्वातंत्र्यानंतर लोकशाही समाजवादी रचनेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी लोकशिक्षण हा कार्यक्रम अतिशय महत्त्वाचा ठरलेला दिसतो. अशा लोकशिक्षणाच्या यशस्वितेसाठी ग्रंथालय हे अत्यंत प्रभावी साधन आहे. गेल्या दोन शतकात वैज्ञानिक तंत्रज्ञान आणि संशोधनाच्या प्रगतीचा एक टप्पा ओलांडला आहे, आणि या बदलाचा वेग वाढतच राहणार आहे. याला ग्रंथालये अपवाद नाहीत. यामूळेच पारंपारिक ग्रंथालयाची वाटचाल कागदविरहीत ग्रंथालयाकडे चालली आहे. संगणकाच्या अतिवापरामुळे ग्रंथालयाचे अस्तित्व संपुष्टात येईल की काय अशी भिती व्यक्त केली जात आहे. म्हणूनच सार्वजनिक ग्रंथालयांनी संस्कृती, चालीरिती, रुढी, परंपरा, इतिहास इत्यादीबाबत सांस्कृतिक केंद्र या नात्याने सांस्कृतिक वारसा व वैशिष्ट्ये सांगणाऱ्या गोष्टींचे संरक्षण करण्याबाबत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असल्यामूळे

ग्रंथालयाचे अस्तित्व चिरकाल राहणार यात शंकाच नाही. एकूणच ग्रंथालयांचे मानवी विकासातील योगदान आणि भूमिका महत्त्वपूर्ण असल्याने सार्वजनिक वाचनालयांचा प्रसार आणि वाङ्मयीन अभिरूची निर्माण होणे ही आजच्या काळाची खरी गरज आहे.

**सार्वजनिक ग्रंथालयांचा परिचय :**

इ.स. १८०४ साली महाराष्ट्रात ग्रंथालयाचा प्रारंभ झाला. इस्ट इंडिया कंपनीचे सरन्यायाधीश जेम्स मॅकिरॉश यांच्या प्रयत्नाने मुंबईत लिटररी सोसायटी स्थापन झाली व एका खाजगी डॉक्टराकडून ग्रंथसंग्रह खरेदी करून दि. २५ फेब्रुवारी १८०५ रोजी त्यांनी ग्रंथालयाची स्थापना केली.[१] पाश्चात्य ज्ञानाची गोडी महाराष्ट्रातील नवशिक्षितांना लागावी. या हेतूने इ.स. १८३१ ते १८५५ या काळात नेटिव्ह जनरल लायब्ररीज या नावाने जिल्ह्याच्या प्रमुख ठिकाणी कंपनी सरकारने ग्रंथालये स्थापन केली. लोकमान्य टिळक, लोकहितवादी, म. गो. रानडे, वि. ल. भावे यांच्या प्रयत्नातून मराठी ग्रंथाचेच ग्रंथालय स्थापन करण्याची कल्पना पुढे येवून ठाणे येथे इ.स. १८९३ साली पहिले मराठी ग्रंथालय स्थापन झाले. महाराष्ट्रात ग्रंथालय चळवळीचे एकसूत्रीकरण करण्याच्या उद्देशाने इ.स. १९६२ साली महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ स्थापन झाला. एकात्मिक, सर्वसमावेशक, कार्यक्षम, सार्वजनिक ग्रंथालय प्रणाली राज्यामध्ये स्थापन करण्याच्या उद्देशाने इ.स. १९६७ साली महाराष्ट्र सरकारने ग्रंथालय कायदा केला. इ.स. १९६८ साली केवळ ४७४ सार्वजनिक ग्रंथालये होती आता ती संख्या ७१५२ इतकी आहे.[२]

कोल्हापूर जिल्ह्यात सर्वप्रथम कर्नल ॲडरसन या इंग्रज अधिकाऱ्याच्या प्रयत्नाने व प्रेरणेने सन १८५० मध्ये कोल्हापूर नेटिव्ह लायब्ररी या नावाने ग्रंथालय सुरू केले.[३] पुणे विभागात पुणे, सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा हे पाच जिल्हे असून एकूण सुमारे १६०० ग्रंथालये कार्यरत आहेत. त्यापैकी कोल्हापूर हा सर्वात जास्त ग्रंथालये असणारा जिल्हा

आहे. सध्या कोल्हापूर जिल्ह्यात ९ 'अ' वर्ग, ५० 'ब' वर्ग, १६२ 'क' वर्ग आणि २१७ 'ड' वर्ग अशी एकूण ४३८ ग्रंथालये कार्यरत आहेत. महाराष्ट्रात एकूण ७७ ग्रंतालयांनी शतकोत्तर वाटचाल पूर्ण केली आहे. यापैकी कोल्हापूर जिल्ह्यातील ९ ग्रंथालये शतायुषी आहेत.[४]

**अभ्यासाचे महत्त्व :**

प्रत्येक सार्वजनिक ग्रंथालयामध्ये संचालक मंडळ असते. संचालक मंडळाची निवड करीत असताना अनुसूचित जाती-जामीतीतील त्सेच महिलांना प्राधान्य दिले जाते. संचालक मंडळाची निवड करीत असताना सार्वजनिक ग्रंघालयाच्या अधिकृत सभासदांच्या मतानुसार निवडले जातात.

सार्वजनिक ग्रंथालयाच्या संचालक मंडळातून अध्यक्ष, उपाध्यक्ष यांची निवड केली जाते. सार्वजनिक ग्रंथालयाच्या सर्व कामकाजावर देखरेख व नियंत्रण ठेवण्याचे काम संचालक मंडळामार्फत केले जाते. सार्वजनिक ग्रंथालयामध्ये ज्यांचे ज्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. अशा सर्व घटकांना सार्वजनिक ग्रंथालयामध्ये प्रतिनिधित्व दिलेले आहे. सार्वजनिक ग्रंथालयाचे दैनंदिन प्रशासकीय कामकाज हे ग्रंथपालांच्या मार्गदर्शनाखाली चालते. सध्या सार्वजनिक ग्रंथालयामध्ये ग्रंथपाल, सहायक ग्रंथपाल, ग्रंथपाल मदतनिस, ग्रंथालय लिपिक, शिपाई अशी पदांची रचना सर्वसाधारण करण्यात आली आहे.

सार्वजनिक ग्रंथालयाच्या माध्यमातून आजपर्यंत समाज प्रबोधनाचे कार्य करण्यात प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या महत्त्वपूर्ण ठरले आहे. गेल्या दोन शतकात वैज्ञानिक तंत्रज्ञान आणि बदलत्या संगणक माध्यमांच्या प्रगतीमुळे पारंपारिक ग्रंथालयाची वाटचाल कागदविरहीत ग्रंथालयाकडे चालली आहे. यामुळे एकूणच या परिस्थितीचा ग्रंथालयाच्या प्रशासकीय रचनेमध्ये व वाचकांवर परिणाम होत आहे. त्याचबरोबर या ग्रंथालय प्रशासनासमोर अनेक समस्या आहेत. जागेचा प्रश्न, इमारतींचा प्रश्न, शासनाकडून मिळणारे अनुदान, अत्याधुनिक सेवा सुविधा इ. काही महत्त्वाच्या समस्या आज सार्वजनिक ग्रंथालयासमोर आहेत. एकीकडे

इंटरनेटच्याद्वारे उपलब्ध होणारी माहिती, पुस्तके, ग्रंथ तर दुसरीकडे सार्वजनिक ग्रंथालयाची कार्यपद्धती यामुळे वाचकांमध्ये ग्रंथ, पुस्तके घेवून वाचन करणे कमी झाले आहे. शहरामध्ये हे प्रमाण जास्त दिसून येते. काही ग्रंथालये जागतिकीकरणाच्या व उदारीकरणाच्या प्रभावामुळे बदलत आहेत. तेथील प्रशासन वाचकापर्यंत पोहोचण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण मार्गाचा अवलंब करीत आहेत, परंतू काही ग्रंथालये परंपरागत पद्धतीनेच सुरू आहेत. याचा परिणाम सार्वजनिक ग्रंथालयाच्या उद्दिष्टांच्या परिपूर्ततेवर होतो आहे. एकूणच सर्व परिस्थितीचा विचार करता सार्वजनिक ग्रंथालयासमोर काही प्रशासकीय, आर्थिक आणि संप्रेषण या समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळे 'ई' ग्रंथालयांच्यासमोर टिकण्यासाठी व आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयाने प्रशासकीय व संरचना क्षेत्रात बदल करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने कोल्हापूर जिल्ह्यातील शतकोत्तरी सार्वजनिक ग्रंथालये निवडून त्यांच्या प्रशासकीय कार्याचा, रचनेचा अभ्यास करणे व त्याचा मागोवा घेवून ग्रंथालये जागतिकीकरणाच्या, उदारीकरणाच्या जगामध्ये टिकण्यासाठी काही सूचना करणे यासाठी सार्वजनिक ग्रंथालयातील प्रशासनाचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने हा विषय शोधप्रबंधासाठी निवडण्यात आला आहे.

'सार्वजनिक ग्रंथालयाचे प्रशासन : एक अभ्यास' (विशेष संदर्भ कोल्हापूर जिल्ह्यातील शतकोत्तरी सार्वजनिक ग्रंथालये) हा शोधप्रबंध लिहित असताना कोल्हापूर जिल्ह्यातील शतकोत्तरी सार्वजनिक ग्रंथालयांचा परिचय, भारतातील, महाराष्ट्रातील व कोल्हापूर जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालय चळवळीची ऐतिहासिक पार्श्वभूमी, सार्वजनिक ग्रंथालयाची प्रशासकीय रचना व कार्य, कोल्हापूर जिल्ह्यातील शतकोत्तरी सार्वजनिक ग्रंथालयांचा तुलनात्मक अभ्यास या सर्वांचा विचार करण्यात आला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील शतकोत्तरी सार्वजनिक ग्रंथालयांनी जी विकासात्मक वाटचाल केली आहे ती उल्लेखनीय आहे. जिल्ह्यातील नागरी व ग्रामीण भागामध्ये सार्वजनिक

ग्रंथालयांची जी प्रगतीची वाटचाल सुरु आहे, त्यामुळे जिल्ह्याच्या शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकास घडून आला आहे. सार्वजनिक ग्रंथालयांनी गेल्या शंभर वर्षात जे प्रगतीचे टप्पे गाठले आहेत ते पहात असताना भविष्यकाळात ग्रंथालये जागतिकीकरणाच्या व उदारीकरणाच्या प्रभावामुळे बदलत आहेत. तेथील प्रशासन वाचकांपर्यंत पोहोचण्यासाठी वैशिष्ट्यपूर्ण मार्गाचा अवलंब करीत आहेत, परंतु काही ग्रंथालये परंपरागत पद्धतीनेच सुरू आहेत. याचा परिणाम ग्रंथालयाच्या कार्यावर होतो. एकूणच सर्व परिस्थितीचा विचार करता असे निदर्शास येते की, सार्वजनिक ग्रंथालयासमोर काही प्रशासकीय, आर्थिक आणि संप्रेषण इ. समस्या निर्माण झालेल्या आहेत. त्यामुळे संगणक, इंटरनेट इ. आधुनिक माध्यमे असणाऱ्या ग्रंथालयांच्यासमोर टिकण्यासाठी व आपले उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सार्वजनिक ग्रंथालयांना आपल्या प्रशासनात सुधारणा करून वाटचाल करावी लागेल. याच दृष्टीने सार्वजनिक ग्रंथालयांच्या प्रशासनाचे मूल्यमापण करणे व भविष्यात सार्वजनिक ग्रंथालयांच्या सक्षमतेसाठी संबंधीत घटकांनी सुचविलेल्या शिफारशीचा विचार करणे महत्त्वाचे वाटते.

**शोधप्रबंध विषयाची व्याप्ती :**

सदर शोधप्रबंधाच्या अभ्यासासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील नऊ शतकोत्तरी सार्वजनिक ग्रंथालयांची निवड केलेली आहे.

करवीर नगर वाचन मंदिर, कोल्हापूर (१८५०), जिल्हा वर्ग 'अ', आपटे वाचन मंदिर, इचलकरंजी (१८७०) तालुका वर्ग 'अ', साने गुरुजी वाचनालय, गडहिंग्लज (१८७४) तालुका वर्ग 'अ', श्री शाहू वाचनालय, गारगोटी (१८७६), तालुका वर्ग 'अ', राजर्षी शाहू वाचन मंदिर, शिरोळ (१८७७) तालुका वर्ग 'अ', सार्वजनिक वाचनालय मलकापूर (१८८१) तालुका वर्ग 'ब', राणी अहिल्यादेवी वाचनालय, सेनापती कापशी (१८८४) इतर वर्ग 'ब' महात्मा गांधी वाचनालय, कागल (१८८४) तालुका वर्ग 'ब', श्रीमंत गंगाबाई वाचन मंदिर, आजरा (१८८९) तालुका वर्ग 'ब' इत्यादी सार्वजनिक शतकोत्तरी ग्रंथालयाचा समावेश

केलेला आहे.[५] या नऊ ग्रंथालयाची प्रशासकीय रचना व कार्ये याचा अभ्यास करून निष्कर्ष मांडले आहेत.

**शोधप्रबंधाची उद्दिष्ट्ये :**

१) कोल्हापूर जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयांच्या विकास चळवळीचा अभ्यास करणे.

२) सार्वजनिक ग्रंथालयाच्या प्रशासकीय रचनेचा अभ्यास करणे व त्यातील उणिवांचा शोध घेणे.

३) सार्वजनिक ग्रंतालयातील प्रशासकीय कार्याचा अभ्यास करणे व सार्वजनिक ग्रंथालयांची कार्ये यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी उपाय सांगणे.

४) सार्वजनिक ग्रंथालयासमोरील आव्हानांचा शोध घेऊन सार्वजनिक ग्रंथालया समोरील आधुनिक प्रसार माध्यमांचा परिणाम अभ्यासणे.

**पूर्वाभ्यास :**

१) बोरकर हरिश्चंद्र : सार्वजनिक ग्रंथालयाकरिता आकृतीबंध व अनुदान संहिता, संपा. बुवा, जी. ए. ग्रंथोपजीवी ४३ वे महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संमेलन, सावंतवाडी, १९९७.

२) उजळंबकर कृ. मु. : कोल्हापूर सार्वजनिक ग्रंथालये, विकासाची वाटचाल, संपा. देशपांडे ना. वि. ग्रंथपरिवार, फेब्रु. १९९५

३) शेजूळ का. म. : सार्वजनिक ग्रंथालये आणि शासनाचे धोरण, ग्रंथोपजीवी, संपा. बुवा जी. ए. ४३ वे महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संमेलन, सावंतवाडी, १९९७.

४) उरणे, म. वि. व दाईंगडे, श्याम ज. : महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय संचालनामार्फत सार्वजनिक ग्रंथालयांना मिळणारे अनुदाने, ग्रंथोपजीवी, संपा. बुवा जी. ए. १९९७.

५) नातू श्री. ग. : सर्वासाठी ग्रंथालये, पुणे, सिद्धार्थ मोफत वाचनालय आणि ग्रंथालय, १९८४.

सदरच्या विषयावर एम.लिब. च्या पदसवीसाठी जरी संशोधन झाले असले तरी एम. फील. अथवा पीएच.डी. पदवीसाठी कोल्हापूर जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयाचे प्रशासन विषयावर संशोधन झालेले नाही. म्हणून हा विषय एम.फील. पदवीसाठी निवडला आहे.

**गृहितके :**

१) महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय अधिनियम, १९६७ या कायद्यातील उणिवांचा शोध घेणे.

२) ग्रंथालयाच्या आर्थिक विकासासाठी योजना सुचविणे.

३) सार्वजनिक ग्रंथालयाचे ग्रंथपाल, कार्यकारी मंडळ यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी उपाय सुचविणे.

४) ग्रंथालयाचा विकास होण्यासाठी वाढत्या महागाईप्रमाणे अनुदानात वाढ सुचविणे.

५) ग्रंथालय कायद्यात सुधारणा करण्यासाठी शासनाने नेमलेल्या प्रभा राव समिती, पागे समिती व पत्की समित्यांच्या अहवालाचा आढावा घेणे.

६) विद्यापीठांमधील काही निवडक एम. फिल. व पीएच.डी. प्रबंधाचे पुस्तक रुपात प्रकाशित करून सार्वजनिक ग्रंथालयात वाचकांसाठी उपलब्ध करून देणे.

७) वयोवृद्ध लेखक (ज्यांना लिखाण करणे शक्य नाही) अशा लेखकांना लेखनिक देऊन त्यांचे साहित्य विचार शासनाने प्रकाशित करणे.

**अभ्यास पद्धती :**

प्रस्तुत शोधप्रबंधासाठी वार्षिक अहवाल, दप्तरी दस्तऐवज यांचा प्राथमिक साधने म्हणून वापर करण्यात आलेला आहे. तसेच संदर्भग्रंथ, वृत्तपत्रातील लेख, मुलाखत या दुय्यम साधनांद्वारे माहितीचे संकलन केलेले आहे. त्याचबरोबर ग्रंथालयाचे महत्वाचे तीन घटक आहेत. वाचक सभासद, ग्रंथपाल व कार्यकारी मंडळ यांच्याकडून प्रत्यक्ष प्रश्नावली द्वारे माहितीचे संकलन केले आहे.

**संदर्भ ग्रंथ :**


१. Mahajan, S. G. : History f the Public Library Movement in Maharashtra, Pune, Shubhada Saraswati Publication Pvt. Ltd., 1984, P. 42.

२. पाटील, सी. श्री. : विश्व महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयाचे, स्नेहल, देवगड, २००५, पृ.९७.

३. रेगे, वासुदेव रघुनाथ : कोल्हापूर नेटिव्ह लायब्ररी या संस्थेचा साग्र इतिहास, ज्ञानसागर प्रेस, कोल्हापूर, १९१७, पृष्ठ क्र. १,२.

४. पाटील, सी. श्री. : विश्व महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयाचे, स्नेहल, देवगड, २००५, पृ.९९.

५. तत्रैव, पृष्ठ क्र. १०१.